CAREERINDIA

# B

SL. No. : R

ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 47 ]
Total No. of Questions : 47 ]

**CCE RR**
**UN-REVISED**

[ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 8
[ Total No. of Printed Pages : 8

ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : **85-M**

**Code No. : 85-M**

येथून कापा.

# ವಿಷಯ : ಸಮಾಜ ವಿಜ್ಞಾನ

# Subject : SOCIAL SCIENCE

**( ಮರಾಠಿ ಭಾಷಾಂತರ / Marathi Version )**

**( ಹಳೆ ಪಠ್ಯಕ್ರಮ / Old Syllabus )**

**( ಪುನರಾವರ್ತಿತ ಶಾಲಾ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Regular Repeater )**

ದಿನಾಂಕ : 29. 03. 2019 ]
[ Date : 29. 03. 2019

ಸಮಯ : ಬೆಳಗ್ಗೆ 9-30 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 12-30 ರವರೆಗೆ ]
[ Time : 9-30 A.M. to 12-30 P.M.

ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 80 ]
[ Max. Marks : 80

www.careerindia.com

**विद्यार्थ्यांना सामान्य सुचना :**

1. प्रश्न पत्रिकेमध्ये बहुपर्यायी आणि वस्तूनिष्ठ प्रकारचे 47 प्रश्न आहेत.

2. प्रश्न पत्रिका विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परीक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती उघडावयाची आहे. प्रश्न पत्रिकेमधील सर्व प्रश्न व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पाहा.

3. बहूपर्यायी आणि वस्तुनिष्ठ या दोन्ही प्रकारच्या प्रश्नांसाठी दिलेल्या सुचनांचे पालन करा.

4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.

5. पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्न पत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्न पत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटेही दिलेली आहेत.

TEAR HERE TO OPEN THE QUESTION PAPER
प्रश्न पत्रिका येथून कापून उघडा.

Tear here

CAREERINDIA



I. खालील प्रत्येक प्रश्नाला किंवा अपूर्ण वाक्यांशाला चार बहुपर्यायी उत्तरे दिलेली आहेत. त्यापैकी एक पर्याय बरोबर आहे. बरोबर असलेला पर्याय निवडून त्याच्या इंग्रजी मुळाक्षरासह पूर्ण उत्तर दिलेल्या उत्तर पत्रिकेमध्ये लिहा : $10 \times 1 = 10$

1. भारतात ब्रिटिशानी गुंतविलेल्या औद्योगिक भांडवलामुळ

   (A) भारतातील उद्योगांचा विकास झाला

   (B) इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाली

   (C) भारतीय संपत्तीच्या गळतीचे कारण बनले

   (D) भारतातील बेरोजगार कारागारीना उद्योग मिळाला.

2. **यादी - A** मध्ये नेते आणि **यादी - B** मध्ये स्वातंत्र्य भारतानंतर असलेले. त्यांचे पद दिलेले आहे. त्याला योग्य जुळणारा गट ओळखा :

| **यादी - A** | **यादी - B** |
|---|---|
| (a) माऊंटबॅटन | (i) पंतप्रधान |
| (b) जवाहरलाल नेहरू | (ii) गृहमंत्री |
| (c) डॉ० बाबू राजेंद्र प्रसाद | (iii) गव्हर्नर जनरल |
| (d) सरदार वल्लभभाई पटेल | (iv) राष्ट्रपती. |

| | *a* | *b* | *c* | *d* |
|---|---|---|---|---|
| (A) | ii | iv | i | iii |
| (B) | iii | i | iv | ii |
| (C) | i | ii | iii | iv |
| (D) | iv | iii | ii | i |

3. एखाद्या राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रावर नियंत्रण मिळवून स्वतःच्या स्वार्थासाठी त्या राष्ट्राचा उपयोग करणे म्हणजे

   (A) गुलामगीरी (B) वर्णभेद

   (C) शीत युद्ध (D) वसाहतशाही.

www.careerindia.com

CAREERINDIA



4. 1947 शाली भारत आणि पाकिस्तान युद्धावेळी संयुक्त राष्ट्रसंघटनेने ( UNO ) युद्धबंदोचा आदेश यासाठी जारी केला.

(A) युद्धाला विरोधकरण्यासाठी

(B) आंतरराष्ट्रीय शांतता राखण्यासाठी

(C) युद्धाची तयारी करण्यासाठी

(D) संयुक्त राष्ट्रसंघटने कडून युद्ध घोषित करण्यासाठी.

5. महाविद्यालयाच्या एन. एस. एस. चे विद्यार्थी शाळेचे मैदान स्वच्छ करतात. तर हे

(A) मजुरी रहित काम

(B) मजुरी सहित काम

(C) संघटीत काम

(D) असंघटीत काम.

6. स्त्री भ्रूण हत्या नियंत्रणाचा उद्देश

(A) कुटुंब नियोजन पद्धत आमलात आणणे

(B) स्त्रीयाना राखीवता देण्यात आली

(C) गर्भलिंग निदान करणाऱ्या संस्थांवर निर्बंध घालणे

(D) मुलांचा हक्क कायदा आमलात आणणे.

7. सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करण्यास बंदी घातली आहे. याचे कारण

(A) तंबाकूचे सेवन आरोग्यास हाणीकारक आहे

(B) सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता ठेवण्यासाठी

(C) तंबाकुच्या उत्पादनाला परवाणगी आवश्यक आहे

(D) तंबाकूला कायदेशीर निर्बंध आंहे.

www.careerindia.com

CAREERINDIA



8. नकाशात दर्शविलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळांचा जुळणारा योग्य क्रम हा आहे.




(A) 1 – अमृतसर, 2 – हैद्राबाद, 3 – मुंबई, 4 – गुवाहटी

(B) 1 – मुंबई, 2 – गुवाहटी, 3 – अमृतसर, 4 – हैद्राबाद

(C) 1 – हैद्राबाद, 2 – मुंबई, 3 – गुवाहटी, 4 – अमृतसर

(D) 1– गुवाहटी, 2 – अमृतसर, 3 – हैद्राबाद, 4 – मुंबई.

9. 'बँकांची बँक' ही आहे.

(A) औद्योगिक विकास बँक (B) भूविकास बँक

(C) एक्झीम बँक (D) भारतीय रिझर्व्ह बँक ( RBI ).

10. भारत सरकारच्या मुक्त हवाई धोरणाचा या उद्योजकाने फायदा घेतला.

(A) डॉ० प्रताप रेड्डी (B) नरेश गोएल

(C) नारायण मूर्ती (D) धीरुभाई अंबानी.

II. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : 14 × 1 = 14

11. 'कालचक्र' म्हणजे काय ?

12. 42 व्या घटनादुरुस्तीनुसार 'निधर्मी' हा शब्द घटनेत का सामील करण्यात आला ?

13. शीत युद्धानंतरचा परिणाम काय ?

14. निरक्षरतेचे निर्मूलन करण्यासाठी शिक्षण हक्काचे महत्व काय ?



www.careerindia.com

CAREERINDIA



15. सार्कच्या ( SAARC ) प्रगतीवर अडथळा आणणारा घटक कोणता ?

16. 'मजूरीहून शाळेला' या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश कोणता ?

17. भारतातील सर्वात जास्त पाऊस पडणारे ठिकाण कोणते ?

18. 'सुवर्ण क्रांती' म्हणजे काय ?

19. नेपाळला कोसी योजना कशी अनकुल ( फायद्याची ) आहे ?

20. 'द्रवरूप सोने' असे पेट्रोलला का म्हणतात ?

21. अर्थव्यवस्थेतील 'सकारात्मक बदल' ( Positive change ) म्हणजे काय ?

22. तुम्ही दरडोई उत्पन्न कसे ओळखू शकाल ?

23. तुटीचे उत्पन्न-खर्च ( deficit budget ) म्हणजे काय ?

24. जिल्हा औद्योगिक केंद्र केंव्हा स्थापन झाले ?

III. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **दोन** ते **चार** वाक्यात लिहा : $15 \times 2 = 30$

25. रॉबर्ट क्लाईव्हच्या 'दुहेरी राज्य पद्धतीचे' वर्णन करा.

26. तिसरे अँग्लो-म्हैसूर युद्ध ब्रिटिशाना कसे वरदान ठरले ?

27. सत्यशोधक समाजाने केलेल्या सुधारणांचे वर्णन करा.

**किंवा**

भारतीय तत्वज्ञान आणि स्वातंत्र्य चळवळीसाठी ॲनी बेझंटनी दिलेले योगदान कोणते ?

28. मुसोलिनी हुकूमशहा कसा बनला ?

29. जातीयवाद ही आमच्या समाजाची प्रमुख समस्या कशी बनली आहे ?

30. दहशतवादाचे परिणाम कोणते ?

31. पर्यावरण संरक्षणाच्या कोणत्याही चार चळवळींची नावे सांगा.

32. शिवालिक श्रेणी बद्दल थोडक्यात माहिती लिहा.

33. काळी माती आणि वाळवंटी माती यामधील फरक कोणते ?

34. भारतातील अरण्य संरक्षणाचे महत्व सांगा.



www.careerindia.com

CAREERINDIA



35. भौगोलिक माहिती व्यवस्थेचे ( GIS ) महत्व कोणते ?

36. किनारपट्टी कोरणे कसे थांबवू शकतो ?

37. ग्रामीण लोक शहराकडे निर्वासित होण्यापासून रोखण्यासाठी हाती घेण्यात आलेले उपाय कोणते ?

38. पंचवार्षिक योजनेचे मुख्य उद्देश कोणते ?

39. "जागतिकीकरणाचा आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो." कसा ?

IV. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **सहा** वाक्यात लिहा : $6 \times 3 = 18$

40. "इंग्लंड मध्ये झालेली औद्योगिक क्रांती हे 1857 च्या बंडाचे कारण ठरले." या वाक्याचे समर्थन करा.

**किंवा**

"ब्रिटिश शिक्षण पद्धत ही भारतीयांच्यात राष्ट्रीयतेची भावना जागृत करण्यास प्रेरणादायी ठरली." या विधानाचे समर्थन करा.

41. जरी भारत हा शांततेवर प्रेम करणारा देश असला तरी तो संपूर्ण निःशस्त्रीकरणाला प्रोत्साहन देत नाही. का ?

**किंवा**

भारताचे रशीयाशी चांगले संबंध आहेत. कसे ?

42. अस्पृश्यता निर्मुलनासाठी हाती घेतलेले घटनात्मक आणि कायदेशीर उपायांचे वर्णन करा.

**किंवा**

संघटित कामगारानी उपभोगलेल्या सुविधांचे वर्णन करा.

43. जैविक तंत्रज्ञानाच्या विकासाने कृषी क्षेत्रात मोठी क्रांती घडवून आली आहे. याचे वर्णन करा.

**किंवा**

रस्ते वाहतुकीच्या विकासाने कृषी विकासाला प्रोत्साहन दिले आहे. याचे वर्णन करा.

www.careerindia.com

CAREERINDIA



44. ग्रामीण महिलांच्या बळकटीसाठी महिला स्व-सहाय्य संघाच्या भूमिकेचे वर्णन करा.

**किंवा**

केंद्र सरकारने सग्रह केलेल्या प्रमुख करेतर उत्पन्नाचे प्रकार कोणते ?

45. बचत खाते आणि चालू खाते यामधील फरक कोणते ?

**किंवा**

जीवन विमा आणि सामान्य विमा यामधील फरक कोणते ?

V. खालील प्रश्नाचे उत्तरे **आठ (8)** ते **दहा (10)** वाक्यात उत्तर लिहा : 4

46. भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीतील असहकार चळवळीचे वर्णन करा.

VI. 47. भारताचा नकाशा काढा आणि खालील ठिकाणे दाखवा : 1 + 3 = 4

a) $82\frac{1}{2}^{\circ}$ पूर्व रेखांश

b) कैगा

c) भाक्रा-नांगल.

**अंध विद्यार्थ्यांसाठी पर्याय प्रश्न : ( प्रश्न संख्या 47 ऐवजी )**

भारतीय लोकाना हिमालयाचे कोणते उपयोग होतात ? 4

www.careerindia.com

www.careerindia.com